# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

/ फॅक्स ५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in. Web.repune.org.in

जा.क्र.विकापु/विवि/अंमलबजावणी/२००९-१०/ 6226 दिनांक : 22 JUL 2009

प्रति

प्राचार्य,
विनाअनुदानित पदवी अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र / औषधनिर्माण शास्त्र,
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी /पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन
एम.बी.ए आणि एम. सी. ए संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील गुणवत्ता यादी पडताळणी

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२००९/२१०६ दिनांक १७/०७/२००९

या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व विनाअनुदानित संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००८-०९ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.ई/ एम.टेक, एम.फार्म, एम.आर्च, पदव्यूत्तर पदवी तसेच प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र पदवी आणि प्रथम वर्ष वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादया मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून दिनांक २०/०४/२००९ पूर्वी प्रमाणित करून ध्याव्यात. ज्या संस्था दिनांक २०/०४/२००९ पर्यत गुणवत्ता यादया प्रमाणित करून घेणार नाहीत, त्यांच्या गुणवत्ता यादया मा. संचालक, तंत्र शिक्षण सचालनालय, मुंबई यांचे कडून तपासल्या जाणार नाहीत आणि याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील असे या पुर्वी सुचित केले आहे. तथापी अद्यापही काही संस्थांनी आपल्या संस्थांच्या गुणवत्ता यादया प्रमाणित करून घेतलेल्या नाहीत अशा संस्थांनी दिनांक २८/०७/२००९ पुर्वी मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे कडून प्रमाणित करून ध्याव्यात. सदर मुदतीत संस्थेने गुणवत्ता यादी पडताळणी न केल्यास विद्यापीठाने अथवा प्रवेश नियत्रण समितीने प्रतिकुल शेरा दिल्यास होणा-या सर्व शैक्षणिक नुकसानीस संस्था जबाबदार राहील याची नोंद ध्यावी.

गोपंचौधरी
(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. एस.बी. शिन्दे प्रोग्रॅमर यांना सुचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.